ePaper
इस्रायल-इराण युद्धाच्या तणावातही इराणने भारतासोबतची मैत्री जपली

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार,दि. 05 एप्रिल 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




पान 2 वरुन...
'सीईटी'च्या परीक्षेत ६९१ कोटींचा गैरकारभार

पेमेंटच्या मुद्द्यावरून हा निर्णय घेतल्याची चर्चा रंगली; सरकारने यावर अधिकृत स्पष्टीकरण दिले

# इराणचे जहाज भारत ऐवजी चीनकडे का वळवले?



**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**इराणमधून कच्चे तेल घेऊन येणारा टँकर भारताऐवजी चीनकडे रवाना झाल्याचे वृत्त शुक्रवारी वाऱ्यासारखे पसरले. पैशांच्या व्यवहारामुळे हा टँकर चीनकडे वळाला असल्याचं म्हटलं जात होतं. दरम्यान, गुजरातच्या वाडिनार बंदराकडे निघालेले इराणचे कच्चे तेल वाहून नेणारे जहाज (ऑइल टँकर) पेमेंटच्या समस्येमुळे मध्यंतरीच चीनकडे वळवण्यात आल्याच्या वृत्ताचे भारताने शनिवारी खंडन केले आहे. जागतिक तेल व्यापारात प्रवासादरम्यान जहाजांचे मार्ग बदलणे ही एक सामान्य प्रक्रिया आहे, असे स्पष्टीकरण सरकारने दिले आहे.**

'पिंग शुन' (PING SHUN) या अफ्रामॅक्स टँकरला २०२५ मध्ये अमेरिकेने निर्बंध लादले होते, ते गुजरातऐवजी आता चीनच्या डोंगयिंगकडे जात असल्याचे 'केपलर' (KPLER) या जहाज-ट्रॅकिंग संस्थेने शुक्रवारी सांगितले होते. २०१९ नंतर, म्हणजे तब्बल सात वर्षांनंतर इराणकडून भारतात येणारी ही पहिलीच खेप असण्याची शक्यता होती. मध्यपूर्वेतील युद्धामुळे जागतिक ऊर्जा व्यापारात निर्माण झालेल्या व्यत्ययांच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने निर्बंधांमध्ये तात्पुरती सवलत दिल्यानंतर ही हालचाल सुरू झाली होती.

मंत्रालयाने म्हटले आहे की, "भारत ४० हून अधिक देशांतून कच्च्या तेलाची आयात करतो. व्यावसायिक गरजांनुसार विविध स्त्रोतांकडून तेल घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य कंपन्यांना आहे. मध्यपूर्वेतील पुरवठा विस्कळीत झाला असतानाही, भारतीय रिफायनर्सनी इराणसह इतर ठिकाणांहून आपली गरज सुरक्षित केली आहे."

प्रवासादरम्यान जहाजांची गंतव्यस्थाने बदलणे ही उद्योगातील एक प्रमाणित पद्धत आहे. 'बिल ऑफ लॅडिंग'मध्ये अनेकदा तात्पुरत्या बंदरांचा उल्लेख असतो आणि व्यावसायिक सोयीनुसार समुद्रमार्गे जाणारा माल मधूनच दुसऱ्या ठिकाणी वळवला जाऊ शकतो. भारताची कच्च्या तेलाची गरज पूर्णपणे सुरक्षित असल्याचेही मंत्रालयाने सांगितले आहे. यासोबतच, 'सी बर्ड' (SEA BIRD) नावाचे एक एलपीजी जहाज ४४,००० टन इराणी एलपीजी घेऊन २ एप्रिल रोजी मंगळूर बंदरात दाखल झाले असून, सध्या तिथून माल उतरवण्याचे काम सुरू असल्याची माहितीही सरकारने दिली आहे.

कॅप्लर (KPLER) सारख्या कंपन्यांनी 'पिंग शुन' नावाचा टँकर गुजरातच्या वाडीनार ऐवजी चीनकडे जात असल्याचा दावा केला होता. या पार्श्वभूमीवर, मंत्रालयाने स्पष्ट केले की, आंतरराष्ट्रीय तेल व्यापारात जहाजांचा मार्ग बदलणे ही एक सामान्य प्रक्रिया असून, याचा पुरवठ्याशी संबंध जोडणे चुकीचे आहे. कॅप्लर या प्रसिद्ध ट्रॅकिंग कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, 'पिंग शुन' नावाचा एक अफ्रामॅक्स टँकर सध्या चर्चेत आहे. हे जहाज ४ मार्च रोजी इराणच्या खार्ग बेटावरून सुमारे ६ लाख बॅरल तेल घेऊन निघाले आहे. विशेष म्हणजे, हे जहाज अमेरिकेच्या निर्बंधांच्या कक्षेत आहे. सुरुवातीला या जहाजाचे गंतव्यस्थान गुजरातचे वाडीनार बंदर असल्याचे सांगण्यात आले होते आणि ४ एप्रिल ही पोहोचण्याची अंदाजित वेळ होती. मात्र, आता जहाजाचे रडार गुजरातऐवजी थेट चीनमधील डोंगयिंग हे ठिकाण दाखवत आहे. कॅप्लरच्या मते, तांत्रिक यंत्रणेत नोंदवलेले ठिकाण अंतिम नसू शकते, प्रवासादरम्यान त्यात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारत ४० हून अधिक देशांकडून तेल आयात करतो. रिफायनिंग कंपन्यांना त्यांच्या सोयीनुसार तेल खरेदी करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. इराणकडून येणाऱ्या तेलासाठी कोणत्याही प्रकारची पेमेंट अडचण नसल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे.

## पेमेंटच्या समस्यांचे केंद्राने केले खंडन

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने 'X' (ट्विटर) वर पोस्ट करत स्पष्ट केले की, पेमेंटच्या अडचणींमुळे जहाजाचा मार्ग बदलल्याचे दावे वस्तुस्थितीला धरून नाहीत. इराणकडून कच्च्या तेलाच्या आयातीसाठी कोणतीही पैशांची अडचण नाही आणि भारतीय रिफायनर्स विविध जागतिक पुरवठादारांकडून तेल खरेदी करणे सुरूच ठेवणार आहेत.

# ‘सीईटी’च्या परीक्षेत ६९१ कोटींचा गैरकारभार

## खासगी विद्यापीठांच्या फायद्यासाठी 'सीईटी सेल'च्या अधिकाऱ्यांचे संगनमत?

महाईन्यूज । पुणे

**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे (सीईटी सेल) घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांसाठीच्या निविदा केवळ एकाच उद्योग समूहाच्या सहा कंपन्यांना देण्यात येत असल्याचा आरोप ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ धनंजय कुलकर्णी यांनी केला. सीईटी सेलचे अधिकारी आणि या कंपन्यांचे प्रतिनिधी संगनमताने खासगी विद्यापीठांना अनुकूल वेळापत्रक ठरवत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, कुलकर्णी यांनी केलेले आरोप अपुऱ्या माहितीवर आधारित असल्याचे स्पष्ट करत सीईटी सेलने आरोप फेटाळले.**



### सीईटी सेलचे स्पष्टीकरण

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या वतीने व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा घेणे, त्यांचे निकाल जाहीर करणे आणि प्रवेश प्रक्रिया करणे या सर्व बाबींसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. या निविदा प्रक्रियेमध्ये निवड झालेल्या कंपन्यांना परीक्षांचे काम देण्यात आले. ही निविदा प्रक्रिया नियमानुसार करण्यात आली आहे.

कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत सीईटी सेलच्या कारभाराबाबत आरोप केले. ‘गेल्या पाच वर्षांत सीईटी सेलने परीक्षा, संबंधित कामांसाठी ६९१ कोटी रुपये खर्च केले. हा खर्च विद्यार्थ्यांकडून शुल्काद्वारे वसूल केला जातो. २०२१ ते २०२५ या कालावधीत सामायिक प्रवेश परीक्षेसाठीच्या (सीईटी) निविदा केवळ निटकॉन, एज्युस्पार्क आणि स्किल ट्री या कंपन्यांनाच देण्यात आल्या. तर, इंडस एज्युट्रेन, अल्ट्रोरॅप्रो इन्फ्रास्ट्रक्चर, लीडस्पायर कन्सल्टिंग या कंपन्यांना काही कामे देण्यात आली.

कोट्यवधी रुपयांचा खर्च करूनही दरवर्षी सरकारी विद्यापीठे, महाविद्यालयांच्या प्रवेश प्रक्रिया लांबत असल्याचे चित्र आहे. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी परीक्षा होत नाहीत. त्यामुळे व्यावसायिक महाविद्यालयांचे वेळापत्रक कोलमडते. सीईटी सेलचे अधिकारी आणि या कंपन्यांचे प्रतिनिधी संगनमताने खासगी विद्यापीठांना अनुकूल असे वेळापत्रक ठरवतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते,’ असा आरोप कुलकर्णी यांनी केला.

‘सीईटीच्या कामांची निविदा प्रक्रिया स्पर्धात्मक पद्धतीने पार पडणे गरजेचे आहे. मात्र, एकाच उद्योगसमूहाला सीईटीची कामे मिळतील, असे निकष तयार केले जातात. हे निकष पूर्ण करूनही २०२१ मध्ये टीसीएस आणि आयटीआय या कंपन्यांना काम मिळाले नाही. तर निकषांमध्ये तिसऱ्या स्थानी असलेल्या एज्युस्पार्कला काम देण्यात आले. निविदा प्रक्रियेत गैरकारभार होत आहे. त्यातून विद्यार्थ्यांची लूट होत आहे,’ असा आरोप त्यांनी केला. सीईटी सेलच्या कारभाराबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली असून, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याशीही संवाद साधला. त्यानंतर काही अधिकाऱ्यांनी आरोपांबाबत चौकशी करून कारवाईचे आश्वासन दिले. मात्र, अद्याप कारवाई झालेली नाही, असेही कुलकर्णी यांनी नमूद केले.

निटकॉन, एज्युस्पार्क आणि स्किल ट्री या स्वतंत्र कंपन्या असून, त्यातील दिल्ली येथील निटकॉन ही कंपनी सार्वजनिक मालकीची, तर एज्युस्पार्क आणि स्किल ट्री या खासगी कंपन्या आहेत. काही व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचे वेळापत्रक राष्ट्रीय स्तरावरील एआयसीटीई, मेडिकल कौन्सिलिन कमिटी आणि इतर नियामक मंडळ हे ठरवतात. त्यांचे नियम, निर्देशांनुसार प्रवेश प्रक्रिया राबवली जाते. अपुऱ्या माहितीच्या आधारे सीईटी सेलवर केलेले आरोप वस्तुस्थितीला धरून नाहीत, असे सीईटी सेलने स्पष्ट केले.

# हनी सिंगच्या पुण्यातील कॉन्सर्टला पोलिसांकडून कडक अटी

महाईन्यूज । पुणे

**पुण्यात होणाऱ्या लोकप्रिय पंजाबी गायक हनी सिंग यांच्या बहुप्रतीक्षित कॉन्सर्टसंदर्भात शहर पोलिसांनी कडक अटी लागू केल्या आहेत. खराडी परिसरात आयोजित करण्यात येणाऱ्या या कार्यक्रमात अमली पदार्थ, मद्य किंवा अश्लीलतेचे गौरवगान करणारी गाणी सादर करण्यास स्पष्ट मनाई करण्यात आली आहे. पोलिस प्रशासनाने आयोजकांना याबाबत लेखी सूचना दिल्या असून, हा कार्यक्रम “स्वच्छ, सुरक्षित आणि सर्व वयोगटासाठी योग्य” ठेवण्यावर भर देण्यात आला आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, हा कॉन्सर्ट एप्रिलच्या सुरुवातीला होणार होता; मात्र पावसामुळे तो पुढे ढकलण्यात आला. दरम्यान, कार्यक्रमातील गाण्यांच्या आशयाबाबत काही सामाजिक कार्यकर्त्यांनी आक्षेप घेतले होते. त्यांच्या म्हणण्यानुसार, काही गाण्यांमध्ये ड्रग्स, मद्यपान आणि अश्लीलतेचा प्रचार होत असल्याने त्याचा तरुणांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी तातडीने आयोजकांची बैठक बोलावून परिस्थितीचा आढावा घेतला.

या बैठकीत पोलिसांनी स्पष्ट निर्देश दिले की, कॉन्सर्टदरम्यान कोणतेही असे गाणे सादर करता कामा नये ज्यामध्ये अमली पदार्थांचे समर्थन किंवा अश्लीलता दर्शवली जाते. याशिवाय, कार्यक्रमात कोणतीही आक्षेपार्ह दृश्ये, वर्तन किंवा स्टेजवरील सादरीकरण होणार नाही याची पूर्ण जबाबदारी आयोजकांनी घ्यावी, असेही सांगण्यात आले. सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत. पोलिस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अशा मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये तरुणांची मोठी उपस्थिती असते. त्यामुळे समाजावर होणारा परिणाम लक्षात घेऊनच हे निर्णय घेण्यात आले आहेत. “मनोरंजनासोबत सामाजिक जबाबदारीही महत्त्वाची आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारे चुकीचा संदेश जाणार नाही, याची खबरदारी घेणे गरजेचे आहे,” असे पोलिसांनी स्पष्ट केले. आयोजकांनीही पोलिसांच्या सर्व अटी मान्य केल्या असून, कार्यक्रम नियमांनुसार पार पाडण्याचे आश्वासन दिले आहे. त्यांनी सांगितले की, कॉन्सर्टदरम्यान केवळ स्वच्छ आणि सकारात्मक संदेश देणारी गाणी सादर केली जातील. तसेच प्रेक्षकांच्या सुरक्षिततेसाठी आणि शिस्त राखण्यासाठी आवश्यक ती सर्व तयारी करण्यात येत आहे. या निर्णयामुळे पुणेकरांमध्ये मिश्र प्रतिक्रिया पाहायला मिळत आहेत. काहींनी पोलिसांच्या भूमिकेचे स्वागत केले असून, यामुळे कार्यक्रम अधिक कुटुंबस्नेही आणि सुरक्षित होईल, असे मत व्यक्त केले आहे.

# कासारवाडीत कचऱ्यामुळे नागरिक हैराण

## कचरा वाहनांची रस्त्यावर उभी राहणे, सांडपाणी आणि अस्वच्छतेमुळे आरोग्याचा धोका

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड शहरातील महत्त्वाचे उपनगर आणि दळणवळणाचे केंद्र असलेल्या कासारवाडी परिसरात स्वच्छतेच्या समस्येने गंभीर स्वरूप धारण केले असून, याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर आणि दैनंदिन जीवनावर होत आहे. कचरा संकलन केंद्राजवळील परिस्थितीमुळे दुर्गंधी अस्वच्छता आणि वाहतुकीतील अडथळे वाढले आहेत.**





रस्त्यावर सांडणाऱ्या घाण पाण्यामुळे वाहन चालवणे धोकादायक झाले आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून वाहनांचे पार्किंग केंद्राच्या आतच बंधनकारक करावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. स्वच्छतेत मानांकन मिळवणाऱ्या महापालिकेसाठी कासारवाडीतील ही परिस्थिती निश्चितच चिंतेची बाब मानली जात आहे. परिसरातील स्वच्छता, सुरक्षितता आणि नागरिकांचे आरोग्य यासाठी प्रशासनाने त्वरित आणि प्रभावी पावले उचलण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

येथील कचरा वाहतूक करणारे डंपर आणि घंटागाड्या अनेकदा केंद्राच्या आवाराबाहेरच उभ्या राहत असल्याने रस्त्यावर गर्दी होते. काही वाहनांतून ओला कचरा आणि सांडपाणी (लीचेट) रस्त्यावर सांडत असल्याने रस्ते अत्यंत निसरडे झाले आहेत. परिणामी दुचाकीस्वारांचे घसरून अपघात होण्याचे प्रमाण वाढल्याची नागरिकांची तक्रार आहे.

कासारवाडी रेल्वे स्थानक परिसरातून दररोज हजारो प्रवासी ये-जा करतात. मात्र, परिसरात पसरलेल्या दुर्गंधीमुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत असून, अनेकांना नाकाला रुमाल लावूनच प्रवास करावा लागत आहे. याशिवाय साचलेल्या कचरा आणि सांडपाण्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढून साथीचे आजार पसरण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

### संबंधितांवर कारवाईची मागणी

वाहतुकीच्यादृष्टीनेही परिस्थिती चिंताजनक बनली आहे. कचरा केंद्राच्या आत जागा उपलब्ध असतानाही काही वाहनचालक डंपर रस्त्यावरच उभे करतात. त्यामुळे आधीच वर्दळीच्या रस्त्यावर वाहतुकीचा वेग मंदावून दररोज कोंडी निर्माण होत आहे. स्थानिक नागरिकांनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष वेधत तातडीच्या उपाययोजनांची मागणी केली आहे. कचरा वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांचे पार्किंग संकलन केंद्राच्या आवारातच करणे, रस्त्यांची नियमित स्वच्छता राखणे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे या प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

# ‘कलारंग’च्या वतीने महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचा ‘गौरव सोहळा’

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**कला, साहित्य आणि संस्कृतीचे संवर्धन करणाऱ्या ‘कलारंग’ सांस्कृतिक कला संस्थेच्या वतीने महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीत नवनिर्वाचित ठरलेल्या पदाधिकाऱ्यांचा आणि सहकाऱ्यांचा ‘सारस्वतांचा गौरव सोहळा’ निगडी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात अत्यंत उत्साहात संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष मा. श्री. योगेशजी सोमण, प्रमुख कार्यवाह मा. स्वातीताई महाळंक आणि कोषाध्यक्ष मा. श्री. प्रदीप निफाडकर यांचा तसेच महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीतील सुनील महाजन, सुनेत्रा मंकणी, अंजली कुलकर्णी, प्रसाद मिरासदार, माधव राजगुरु, डॉ. नितीन संगमनेरकर, डॉ. आशुतोष जावडेकर, राजन लाखे, पुरुषोत्तम काळे आणि प्रभाकर ओव्हाळ यांचा विशेष सत्कार करण्यात आला.**



महाराष्ट्र साहित्य परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष योगेश सोमण यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या समृद्ध वारशाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले की, ११९ वर्षांची सांस्कृतिक परंपरा असलेल्या या संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळताना एक प्रकारचे दडपण आहे, जे मी नाकारणार नाही. आज माझ्यावर सोपवण्यात आलेली ही जबाबदारी मी अतिशय नम्रपणे स्वीकारत आहे. ही वाटचाल मला अधिक सक्षम आणि तितक्याच सावधपणे करायची आहे. ज्यावेळी मी १ तारखेला या पदाचा कार्यभार स्वीकारला आणि खुर्चीवर बसलो, त्याच क्षणी मला या कर्तव्याची खऱ्या अर्थाने जाणीव झाली. ही केवळ फिरणारी एक साधी खुर्ची नाही, तर १६,९०० हून अधिक सदस्यांच्या नजरा या खुर्चीकडे आशेने लागलेल्या आहेत. त्या प्रत्येक सदस्याला आपण उत्तरदायी आहोत. येत्या पाच वर्षांत आपण जी दिशा ठरवणार आहोत आणि ज्या पद्धतीने काम करणार आहोत, त्यात या सर्वांचा सहभाग कसा राहील, हे पाहणे ही माझी प्राथमिक जबाबदारी असेल. हे पद म्हणजे कोणत्याही एका व्यक्तीच्या विचारशक्तीचे किंवा कल्पनेचे फळ नाही; तर हे अनेकांच्या इच्छाशक्तीचे, अफाट परिश्रमांचे आणि सामुहिक कष्टांचे प्रतीक आहे.या कार्यकारिणीचा प्रत्येक निर्णय हा सर्वसमावेशक असेल, याची मला संपूर्ण जाणीव आहे आणि हे कर्तव्य पार पाडण्यासाठी मी कटिबद्ध आहे. पुढील काळात भाषेचे संवर्धन आणि साहित्याची गोडी जनमानसात निर्माण करण्यासाठी आम्ही एक वर्षाचे सूक्ष्म नियोजन करणार आहोत. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने दोन महत्त्वाच्या गोष्टी समोर आल्या, ज्याची नोंद घेणे आवश्यक वाटते. पहिले म्हणजे, आजवरच्या ९९ संमेलन अध्यक्षांपैकी २५ अध्यक्ष हे फर्ग्युसन महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी राहिले आहेत.

### १०० व्या साहित्य संमेलनासाठी पिंपरी चिंचवड सज्ज

या कार्यक्रमाप्रसंगी बोलताना आमदार अमित गोरखे यांनी पिंपरी-चिंचवड शहराच्या सांस्कृतिक व साहित्य वैभवात भर टाकणारी महत्त्वाची अपेक्षा व्यक्त केली. आगामी १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे पिंपरी-चिंचवड शहरात व्हावे, अशी इच्छा त्यांनी यावेळी बोलून दाखवली. शहराची क्षमता आणि येथील साहित्यप्रेमींचा उत्साह लक्षात घेता, हे ऐतिहासिक संमेलन आयोजित करण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले.आमदार अमित गोरखे म्हणाले की, साहित्यिक हे समाजाला दिशा देण्याचे काम करतात. अशा विद्वान व्यक्तिमत्त्वांचा गौरव करणे हे आमचे भाग्य असून, पिंपरी-चिंचवड शहराच्या साहित्य व सांस्कृतिक चळवळीला यामुळे नवी ऊर्जा मिळेल.



भूमिका

# लोकशाहीसाठी एक ऐतिहासिक जनआंदोलन



**अमेरिकेच्या लोकशाही इतिहासात २८ मार्च २०२६ हा दिवस एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. अमेरिका या देशात १७७६ पासून आजपर्यंत अनेक आंदोलने झाली, परंतु एवढ्या व्यापक प्रमाणात, इतक्या संघटित पद्धतीने आणि शांततेत पार पडलेले जनआंदोलन अभूतपूर्व मानले जात आहे. अंदाजे ८० लाखांहून अधिक नागरिकांनी या आंदोलनात सहभाग नोंदविला.**

या आंदोलनाचे केंद्रबिंदू म्हणजे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांविरोधातील असंतोष. आंदोलकांनी स्पष्टपणे सांगितले की त्यांचा विरोध व्यक्तीला नसून कार्यपद्धतीला आहे. ट्रम्प यांच्या कारभारात एकतर्फी निर्णय, सत्तेचा अतिरेक आणि लोकशाही संस्थांवर दबाव टाकण्याच्या प्रवृत्ती दिसून येत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. त्यामुळेच “राजा नको, लोकशाही हवी” असा घोष देत नागरिक रस्त्यावर उतरले.

लोकशाहीची संकल्पना मांडताना अब्राहम लिंकन यांनी “लोकांचे, लोकांद्वारे, लोकांसाठी चालणारे शासन” अशी व्याख्या केली होती. परंतु सध्याच्या परिस्थितीत हीच लोकशाही धोक्यात आल्याची भावना अनेक अमेरिकन नागरिकांच्या मनात निर्माण झाली आहे. यामुळेच हे आंदोलन केवळ राजकीय नसून मूल्यांवरील लढा ठरला आहे.

या आंदोलनाचे एक विशेष वैशिष्ट्य म्हणजे त्याची शांतता आणि शिस्त. लाखो लोक रस्त्यावर उतरले, तरी कुठेही हिंसाचार, तोडफोड किंवा मोठ्या प्रमाणात अटक झाल्याचे प्रकार घडले नाहीत. हे अमेरिकन लोकशाही संस्कृतीचे सामर्थ्य दर्शवते. जगातील इतर लोकशाही देशांसाठी हे एक आदर्श उदाहरण ठरू शकते.

या आंदोलनामागे अनेक कारणे आहेत. महागाई, वाढते इंधन दर, आणि परराष्ट्र धोरणातील आक्रमक भूमिका यामुळे सामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. विशेषतः इराण संदर्भातील लष्करी कारवाईमुळे अनेक कुटुंबांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. आपल्या मुलांचे आणि नातेवाईकांचे भविष्य धोक्यात येईल या भीतीने अनेक नागरिकांनी आंदोलनात सहभाग घेतला.

याशिवाय युरोप मधील देशांमध्येही या आंदोलनाचे पडसाद उमटले. अमेरिकेच्या पारंपरिक मित्रदेशांशी असलेले संबंध ताणले गेल्याची भावना व्यक्त होत आहे. ट्रम्प यांच्या कठोर भूमिकेमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिकेची प्रतिमा धक्का बसल्याचे अनेकांचे मत आहे.

या जनआंदोलनाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची संघटनात्मक ताकद. विविध विचारसरणीच्या आणि निपक्षपाती संघटनांनी एकत्र येत कोणतेही श्रेयवाद न ठेवता हे आंदोलन उभे केले. “हे आंदोलन सर्वांचे आहे” या भावनेतून त्याची रचना करण्यात आली. त्यामुळेच ते अधिक व्यापक आणि प्रभावी ठरले.

गेल्या काही महिन्यांमध्ये या आंदोलनाचे तीन टप्पे झाले. जून २०२५ मध्ये ४ ते ६ दशलक्ष लोक सहभागी झाले होते, ऑक्टोबर २०२५ मध्ये हा आकडा ७ दशलक्षांपर्यंत गेला, आणि मार्च २०२६ मध्ये तो ८ दशलक्षांवर पोहोचला. या वाढत्या प्रतिसादातून नागरिकांचा असंतोष स्पष्टपणे दिसून येतो. एकंदरीत, हे आंदोलन केवळ सरकारविरोधी नव्हे, तर लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी उभे राहिलेले जनशक्तीचे प्रतीक आहे. भविष्यात या आंदोलनाचा परिणाम अमेरिकेच्या राजकारणावर आणि जागतिक स्तरावर नक्कीच दिसून येईल. लोकशाही टिकवण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग किती महत्त्वाचा आहे, याची जाणीव या आंदोलनाने पुन्हा एकदा करून दिली आहे.

## प्रासंगिक »

### चांगला राजा

**एकदा एका तळ्यातला बेडकांना वाटले, की आपल्याला एक राजा हवा. म्हणून त्यांनी देवाकडे तशी मागणी केली.**

तेव्हा देवाला हसूच आले व त्याने 'हा घ्या राजा !' म्हणून एक लाकडी ओंडका तळ्यात टाकला. तो पाण्यावर पडताच पाणी उसळले. ते पाहून सगळे बेडूक घाबरले आणि बाजूला जाऊन बसले. थोड्या वेळाने पाणी शांत झाल्यावर तो ओंडका काही हालचाल करीत नाही असे पाहून त्याच्यावर चढले व उड्या मारू लागले. मग त्यांना वाटले की या राजापेक्षा दुसरा चांगला राजा हवा. तेव्हा त्यांनी देवाची प्रार्थना करून दुसरा चांगला राजा पाठवण्याची विनंती केली. देवाने एक बगळा पाठविला. त्याने बेडकांना मारून खायला सुरुवात केली. म्हणून बेडकांनी देवाकडे अजून चांगल्या राजाची मागणी केली. ते ऐकून देव म्हणाला, 'मी तुम्हांला पहिला राजा पाठवला होता तो तुम्हांला आवडला नाही. आता तुमचं कर्म तुम्हीच भोगा.'

- तात्पर्य:

देवाने ज्या स्थितीत ठेवले आहे त्यात समाधानी असावे.


‘ड्रोन्ना’ हे केवळ एक स्त्री पात्र नाही, तर ती एक जिवंत रूपक आहे—मुक्ततेचे, बंडखोरीचे आणि आत्मशोधाचे. तिच्या व्यक्तिमत्वात एक वेगळीच ऊर्जा आहे; ती समाजाच्या बंधनांमध्ये अडकणारी नाही, तर स्वतःच्या अटींवर आयुष्य जगणारी आहे.

# स्त्री तृष्णेचं घनदाट झाड, तर पुरुष वासनेचा डोह!

तिच्या माध्यमातून ‘तृष्णा’ या भावनेचा शोध घेण्याचा प्रयत्न दिसतो—ही तृष्णा केवळ भौतिक नाही, तर मानसिक, भावनिक आणि अस्तित्वाच्या पातळीवरची आहे.

ड्रोन्ना स्वतःच्या जीवनाचा अर्थ शोधत असताना अनेक प्रश्नांना सामोरी जाते. तिच्या आत एक आग आहे—स्वतंत्रतेची, स्वतःला सिद्ध करण्याची. ती परंपरागत चौकटी मोडून पुढे जाण्याची हिंमत ठेवते. तिच्यासाठी ‘लोक काय म्हणतील’ हा प्रश्न गौण आहे; तिच्यासाठी महत्त्वाचं आहे ते स्वतःचं सत्य आणि स्वतःचा आवाज. पक्ष्यांसारखी मुक्तपणे गाणं, आकाशात उंच भरारी घेणं आणि निर्भयपणे जगणं—हीच तिची ओळख आहे.

‘झेन्ना’ हे पात्र या कथनात एक वेगळीच छटा आणते. झेन्ना ही केवळ एक संकल्पना नसून स्त्रीच्या अंतर्मनात दडलेलं एक अद्भुत, मोहमयी रूप आहे. या शब्दाची व्युत्पत्तीच तिच्या गूढतेला अधोरेखित करते—ग्रीक भाषेतील




स्त्रीलिंगी शब्द, अरबीमध्ये ‘सौंदर्य’, तर हिब्रूमध्ये ‘आनंद’. या सर्व अर्थांचा संगम झेन्नामध्ये दिसतो. ती सौंदर्य आणि आनंद यांची प्रतिमा आहे, पण त्याचबरोबर ती एक गूढ, अनामिक शक्तीही आहे जी प्रत्येक स्त्रीच्या मनात कुठेतरी दडलेली असते.

ड्रोन्ना आणि झेन्ना ही दोन पात्रे एकमेकांना पूरक आहेत. ड्रोन्ना ही बाह्य जगात बंड करणारी, स्वतःच्या अस्तित्वासाठी लढणारी स्त्री आहे, तर झेन्ना ही तिच्या अंतर्मनातील स्वप्न, सौंदर्य आणि आनंदाची प्रतिमा आहे. या दोन्हींच्या संगमातून स्त्रीच्या अस्तित्वाचा अधिक सखोल शोध घेतला जातो. स्त्रीच्या आयुष्यातील वेदना, दुःख, ओढ, प्रेम आणि वासना—या सर्व भावना तिच्या भोवती ‘सर्पा’सारख्या वेढलेल्या असतात. त्या तिला कधी बांधून ठेवतात, तर कधी पुढे जाण्यास प्रवृत्त करतात.

या कवितांचा रचनाबंध कथेच्या अधिक जवळ जाणारा आहे, त्यामुळे वाचकाला त्या अधिक जिवंत आणि अनुभवात्मक वाटतात. प्रत्येक कविता ही एक प्रवास आहे—स्त्रीच्या अंतर्मनाचा, तिच्या संघर्षाचा आणि तिच्या स्वप्नांचा. हा प्रवास केवळ स्त्रीचा नाही, तर तो मानवी तृष्णेचा आहे. स्वतःला समजून घेण्याची, स्वतःच्या अस्तित्वाचा अर्थ शोधण्याची ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे.

शेवटी, ‘ड्रोन्ना’ आणि ‘झेन्ना’ यांच्या माध्यमातून मांडलेला हा शोध म्हणजे लेखकाच्या स्वतःच्या तृष्णेचा एक आरसा आहे. हा आरसा वाचकाला स्वतःकडे पाहण्यास भाग पाडतो आणि कदाचित त्यालाही स्वतःच्या ‘झेन्ना’चा शोध घेण्यास प्रवृत्त करतो.

## ।। अभंगवाणी ।।



ब्रह्म एक परिपूर्ण ।
तेथें नाहीं दोष गुण ॥१॥

पराचा देखती जे दोष ।
तेचि दोषी महादोषी ॥२॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मोटार विहिरीत कोसळून 9 जणांचा मृत्यू

## नाशिक अपघात: मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून विहीर ऑडिटचे आदेश

**महाईन्यूज । नाशिक**

**नाशिकच्या दिंडोरी तालुक्यात खासगी क्लासचे स्नेहसंमेलन आटोपून घरी निघालेली लहान मुले आणि त्यांच्या पालकांची एक गाडी परिसरातील विहिरीत कोसळल्याचा प्रकार शुक्रवारी रात्री समोर आला आहे. या घटनेत नऊ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांनी रस्त्याच्या मध्यभागी किंवा रहदारीच्या ठिकाणी असलेल्या अशा धोकादायक विहिरींचे ऑडिट करण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती दिली.**



### सरकारकडून मदतीची घोषणा

"नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथे शालेय विद्यार्थ्यांचे एक वाहन विहिरीत कोसळून झालेल्या अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला, यात ६ विद्यार्थी आहेत. अतिशय दुर्दैवी आणि मनाला वेदना देणारी ही घटना आहे. मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. मंत्री गिरीष महाजन यांच्याशी मी चर्चा केली असून त्यांनी घटनास्थळी भेट दिली आणि ते समन्वय साधून आहेत. मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक मदत राज्य सरकारतर्फे देण्यात येईल. या घटनेची चौकशी करण्याचे आदेश सुद्धा जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहेत," अशी पोस्ट मुख्यमंत्र्यांनी सोशल मीडियावर केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अतिशय दुर्दैवी घटना आहे. लहान मुलं आणि काही मुलांचे आई-वडील या गाडीत होते. ही गाडी विहिरीमध्ये पडली. आपले आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी त्या ठिकाणावरून माझ्याशी चर्चा केली आणि तिथली परिस्थिती देखील सांगितली. इतक्या लहान मुलांचं असं निधन होणं यापेक्षा अधिक आक्रोश आणि दु:ख दुसरं कुठलंच असू शकत नाही.

या विहिरीला अतिशय छोटा कठडा होता आणि ती मध्यभागी असल्याने ही घटना घडल्याचं प्रथमदर्शनी लक्षात येत आहे. या सर्व कुटुंबाप्रति मी संवेदना व्यक्त करतो. आपण त्या कुटुंबाना मदत देखील घोषित केली आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

रस्त्याच्या मध्ये असलेल्या अशा प्रकारच्या विहिरींचे तात्काळ ऑडिट करून, त्याची तिथे आवश्यकता आहे का, तसेच तेथे काय उपायोजना करता येतील याबद्दलच्या सूचना देण्यात आल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. तसेच या विहिरीचा कठडा उंच असता तर ही घटना टळली असती असेही मुख्यमंत्री म्हणाले. "इथं लक्षात आलं की, भिंत होती, पण ती छोटी. ती मोठी असती तर एखाद्या वेळेस ते वाचू देखील शकले असते. त्यामुळे तात्काळ यासंदर्भातील कारवाई करण्याचे आदेश आपण दिले आहेत. पण ही घटना सर्वांना प्रचंड वेदना देणारी आहे," असे फडणवीस म्हणाले.

# कृष्णा आर्थिक परिवाराचा ३,१०९ कोटींचा एकूण व्यवसाय; अतुल भोसले

**महाईन्यूज । सातारा**

**ग्रामीण अर्थकारणाला चालना देणाऱ्या आणि जनसामान्यांना भक्कम आर्थिक आधार देणाऱ्या कृष्णा आर्थिक परिवाराने दरवर्षीप्रमाणे यंदाही आपली प्रगतीची देदीप्यमान परंपरा कायम राखत, ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात एकूण ३,१०९ कोटींचा व्यवसाय साध्य केला आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा ८७२ कोटींची व्यवसाय वाढ झाली असून, वाढीचे प्रमाण ३८.९८ टक्के राहिले असल्याची माहिती, कृष्णा आर्थिक परिवाराचे प्रमुख तथा कृष्णा सहकारी बँकेचे चेअरमन आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी दिली आहे.**



### तंत्रज्ञानाच्या वापराने सेवा सुलभ करणार : डॉ. अतुलबाबा भोसले

कृष्णा आर्थिक परिवाराची ही प्रगती आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. ग्राहकांचा अढळ विश्वास हाच आमच्या वाटचालीचा खरा आधार आहे. सहकारमहर्षी स्व. जयवंतराव भोसले (आप्पासाहेब) यांनी घातलेल्या सहकाराच्या मजबूत पायावर आम्ही आजही ठामपणे उभे आहोत. डॉ. सुरेश भोसले (बाबा) यांच्या मार्गदर्शनाखाली कृष्णा आर्थिक परिवारातील सर्व संस्थांनी सातत्याने पारदर्शकता, विश्वासार्हता आणि शिस्तबद्ध आर्थिक व्यवहार यावर भर दिला आहे. त्याचेच फलित म्हणून आज आम्ही नफ्यात वाढ आणि व्यवसाय विस्तार साध्य करत आहोत. या यशामध्ये सर्व संस्थांचे संचालक व व्यवस्थापक मंडळाचे सदस्य, अधिकारी, कर्मचारी आणि ग्राहकांचे योगदान महत्वपूर्ण आहे. येत्या काळातही आम्ही ग्राहककेंद्रित धोरण कायम ठेवत, तंत्रज्ञानाचा अधिक प्रभावी वापर करून सेवा अधिक सुलभ, जलद आणि सुरक्षित करण्यावर भर देणार आहोत, असे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी स्पष्ट केले.

याबाबत प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे, की सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी यांना केंद्रबिंदू मानून, लोकांना बचतीची सवय लागावी व गरजेनुसार कर्ज घेता यावे, यासाठी सहकारमहर्षी स्व. जयवंतराव भोसले (आप्पासाहेब) यांनी सन १९७१ साली कृष्णा सहकारी बँकेची स्थापना केली. य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले (बाबा) यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या कृष्णा बँकेने गेली ५५ वर्षे अव्याहतपणे सेवा देत, सर्वसामान्यांचे हित जपले आहे. याच्याच जोडीला २५ वर्षांपूर्वी स्थापन झालेली सहकारमहर्षी मा. जयवंतराव भोसले (आप्पा) नागरी सहकारी पतसंस्था, कृष्णा महिला नागरी सहकारी पतसंस्था आणि वित्तपेटा मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटीव्ह सोसायटी यांचा मिळून एकत्रित कृष्णा आर्थिक परिवार बनला आहे. या परिवारात नुकतीच दि पाटण अर्बन सहकारी बँकेची भर पडली आहे. या सर्व संस्थांनी मिळून ग्राहकांच्या अखंड विश्वासाच्या बळावर भक्कम झेप घेत, ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात एकूण ३,१०९ कोटींचा व्यवसाय साध्य केला आहे.

कृष्णा सहकारी बँकेच्या ३१ मार्च २०२६ अखेरच्या एकूण ठेवी ९५१ कोटी ३५ लाख रूपयांच्या असून, ५६१ कोटी ५४ लाख रूपयांचे कर्जवाटप केले आहे. बँकेचा एकूण व्यवसाय १५१२ कोटी ८९ लाख रुपये झाला आहे. बँकेचे एकूण भागभांडवल १२ कोटी ३० लाख आहे; तर १३० कोटी ६३ लाखांचा स्वनिधी आहे. तसेच बँकेला २० कोटींचा ढोबळ नफा प्राप्त झाला आहे. बँकेने सलग १२ व्या वर्षी निव्वळ एन.पी.ए. शून्य टक्के राखण्यात यश मिळविले आहे.

सहकारमहर्षी मा. जयवंतराव भोसले (आप्पा) नागरी सहकारी पतसंस्थेकडे ३१ मार्च २०२६ अखेरच्या एकूण ठेवी ६३९ कोटी २२ लाख रूपयांच्या असून, ४४८ कोटी २५ लाख रूपयांचे कर्जवाटप केले आहे. पतसंस्थेचा एकूण व्यवसाय १,०८७ कोटी ४७ लाख रुपये झाला आहे. पतसंस्थेचे एकूण भागभांडवल २ कोटी २० लाख आहे; तर १४ कोटी ६८ लाखांचा स्वनिधी आहे. तसेच पतसंस्थेला ६ कोटी ६९ लाखांचा ढोबळ नफा प्राप्त झाला असून, निव्वळ एन.पी.ए. शून्य टक्के आहे.

कृष्णा महिला नागरी सहकारी पतसंस्थेकडे ३१ मार्च २०२६ अखेरच्या एकूण ठेवी ८४ कोटी २८ लाख रूपयांच्या असून, ५६ कोटी रूपयांचे कर्जवाटप केले आहे. पतसंस्थेचा एकूण व्यवसाय १४० कोटी ३६ लाख रुपये झाला आहे. पतसंस्थेचे एकूण भागभांडवल ४३ लाख असून, १ कोटींचा ढोबळ नफा प्राप्त झाला आहेत. तसेच निव्वळ एन.पी.ए. शून्य टक्के आहे.

वित्तपेटा मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटीव्ह सोसायटीकडे ३१ मार्च २०२६ अखेरच्या एकूण ठेवी १९ कोटी ७५ लाख रूपयांच्या असून, १४ कोटी ५१ लाख रूपयांचे कर्जवाटप केले आहे. संस्थेचा एकूण व्यवसाय ३४ कोटी २७ लाख रुपये झाला.

कृष्णा आर्थिक परिवारात नव्यानेच सामील झालेल्या दि पाटण अर्बन सहकारी बँकेच्या ३१ मार्च २०२६ अखेरच्या एकूण ठेवी २०९ कोटी ६७ लाख रूपयांच्या असून, १२४ कोटी ७९ लाख रूपयांचे कर्जवाटप केले आहे. बँकेचा एकूण व्यवसाय ३३४ कोटी ४७ लाख रुपये झाला आहे. बँकेचे एकूण भागभांडवल ८ कोटी २२ लाख आहे; तर २६ कोटी ४६ लाखांचा स्वनिधी आहे. तसेच बँकेला २ कोटी ७६ लाखांचा ढोबळ नफा प्राप्त झाला आहे.

# इराणने भारतासोबतची मैत्री जपली

## होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडल्यानंतर इराणकडून भारतासाठी भावनिक संदेश

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्या सुरू असलेला संघर्ष अद्याप संपलेला नाही. या युद्धामुळे इराणने जागतिक तेल व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग समुद्री मार्ग असलेली होर्मुझची सामुद्रधुनी रोखून धरली आहे. यादरम्यान शुक्रवारी भारतीय ध्वज असलेले सातव्या एलपीजी टँकरने शुक्रवारी ही सामुद्रधुनी ओलांडल्याची माहिती समोर आली आहे. याबरोबरच इराणने भारतासाठी एक खास संदेश पोस्ट केला आहे.**






मुंबईतील इराणच्या वाणिज्य दूतावासाने एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एका पोस्ट केली आहे. ज्यामध्ये भारत आणि विशेषतः गुजरातला आमच्या इतिहासात एक अढळ स्थान आहे, असे म्हटले आहे. गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांनी एलपीजी टँकरचा मार्ग खुला होणे हा भारतीय डिप्लोमसीचा विजय असल्याचे म्हटले होते, त्यांच्या याच पोस्टला रिप्लाय देताना इराणच्या वाणिज्य दूतावासाने हे विधान केले आहे.

"भारत आणि विशेषतः गुजरात आमच्या इतिहासात एक महत्त्वाचे स्थान बाळगून आहे, शतकांपूर्वी आमच्या भूमीतून आलेल्या लोकांचे त्यांनी उदार मनाने स्वागत केले होते," असे इराणच्या वाणिज्य दुतावासाने म्हटले आहे. इराणच्या वाणिज्य दुतावासाकडून करण्यात आलेले हे विधान गुजरातच्या लोथल नावाच्या प्राचीन बंदराच्या संदर्भात केले असण्याची शक्यता आहे. या बंदराने सुमारे ४ हजार वर्षांपूर्वी सिंधू संस्कृतीमधील शहरांना पर्शियन किनाऱ्याशी जोडले होते.

"या टिकून राहणाऱ्या सांस्कृतिक बंधाच्या आधारावर, आम्ही मैत्री आणि सहकार्याचे संबंध अजून मजबूत करण्यासाठी वचनबद्ध आहोत, असे इराणने म्हटले आहे.

अमेरिका आणि इस्रायलने २८ फेब्रुवारी रोजी हल्ला केल्यापासून इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद केली आहे. यापार्श्वभूमीवर काल ४६६५० मेट्रीक टन एलपीजी घेऊन येणाऱ्या भारतीय ध्वज असलेल्या 'ग्रीन सान्वी' टँकरने ही सामुद्रधुनी ओलांडली आहे. यानंतर सांघवी यांनी एक्सवर एक पोस्ट केली होती. ज्यावर इराणकडून ही प्रतिक्रिया देण्यात आली आहे.

यापूर्वी एलपीजीने भरलेल्या सहा टँकरनी ही सामुद्रधुनी ओलांडली असून ते भारतीय बंदरावर पोहोचले आहेत. मात्र मात्र, अजूनही या सामुद्रधुनीच्या पश्चिमेला भारताची जवळपास १७ जहाजे अडकून पडलेली आहेत. दुसरीकडे इराणने हा महत्त्वाच जलमार्ग बंद केल्याने जगभरात कच्च्या तेलाच्या किमती प्रचंड वाढल्या आहेत.

इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून शत्रू देशांच्या जहाजांच्या वाहतुकीवर निर्बंध लादले असले तरी भारत, रशिया, चीन, इराक आणि पाकिस्तान या पाच मित्र राष्ट्रांसाठी हा मार्ग खुला ठेवला आहे. तसेच, इराणने या महत्त्वाच्या एनर्जी कॉरिडॉरमधून जाणाऱ्या जहाजांवर टोल आकारण्याच्या योजनेलाही मंजुरी दिली आहे.

# 'घायल हूं, इसलिए घातक हूं'; खासदार राघव चड्ढा यांचा 'आप'ला इशारा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**आम आदमी पक्षाने खासदार राघव चड्ढा यांना राज्यसभेतील उपनेते पदावरून हटवल्यामुळे राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चांना उधाण आलं आहे. राघव चड्ढा यांच्या जागी आता खासदार अशोक मित्तल यांची राज्यसभेच्या उपनेते पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, राघव चड्ढा यांना राज्यसभेतील उपनेते पदावरून का हटवलं? याबाबत अनेक सवाल विचारले जात आहेत.**





राज्यसभेच्या उपनेतेपदावरून हटवण्यात आल्यानंतर चड्ढा यांनी 'मला गप्प करण्यात आलं' असं म्हटलं होतं. तसेच चड्ढा यांना उपनेते पदावरून हटवल्यानंतर आम आदमी पक्षाच्या अनेक नेत्यांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली होती. त्यानंतर आता चड्ढा यांनी एक व्हिडीओ शेअर करत आम आदमी पक्षालाच इशारा दिला आहे.


"माझ्या विरोधात एक पूर्वनियोजित मोहीम चालवली जात आहे. एकसारखेच प्रश्न आणि एकसारखेच आरोप माझ्यावर केले जात आहेत. हा योगायोग नाही तर हा एक सुनियोजित हल्ला आहे", असं राघव चड्ढा यांनी म्हटलं आहे. तसेच व्हिडीओच्या शेवटी बोलताना 'घायल हूं, इसलिए घातक हूं', असं म्हणत राघव चड्ढा यांनी 'आप'ला मोठा इशाराही दिला आहे. तसेच आम आदमी पक्षाने केलेल्या तीन आरोपांनाही सडेतोड उत्तर दिलं आहे.

"माझ्या विरोधात कालपासून एक पूर्वनियोजित मोहीम चालवली जात आहे. त्यामध्ये एकसारखी भाषा, एकसारखेच वक्तव्य आणि एकसारखेच आरोप. हा काही योगायोग नाही, तर हा एक सुनियोजित हल्ला आहे. मी आधी विचार केला की यावर काहीही उत्तर द्यायला नको. मात्र, नंतर मला असं वाटलं की जर मी गप्प राहिलो आणि एखाद्याने १०० वेळा वारंवार सांगितलेलं खोटं सुद्धा खरं वाटू लागतं. त्यामुळे मी आता असं ठरवलं की उत्तर देऊच", असं राघव चड्ढा यांनी म्हटलं आहे.

"आम आदमी पक्षाने माझ्यावर तीन आरोप केले. या तीन आरोपांमुळे मला संसदेत बोलण्यापासून रोखलं असं त्यांनी म्हटलं. आता आम आदमी पक्षाच्या या तीन आरोपांबाबत मी सविस्तर बोलत आहे. पहिला आरोप, जेव्हा विरोधी पक्षाचे खासदार संसदेतून सभात्याग करतात तेव्हा मी (राघव चड्ढा) सभागृहात बसून राहतो, सभात्याग करत नाही, असा आरोप माझ्यावर करण्यात आला. पण मी सांगतो हे सगळं खोटं आहे. मी खुलं आव्हान देतो की एक अशी घटना किंवा एक असा दिवस दाखवा की जेव्हा विरोधकांनी सभात्याग केला आणि मी सभात्याग केला नाही", असं राघव चड्ढा यांनी म्हटलं.

"आम आदमी पक्षाने दुसरा आरोप केला की, मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्याच्या प्रस्तावावर मी स्वाक्षरी केली नाही. हा आरोप पूर्णपणे खोटा आहे. या प्रस्तावावर स्वाक्षरी करण्यासाठी मला आम आदमी पक्षाच्या कोणत्याही नेत्यांनी सांगितलं नाही. तसेच आम आदमी पक्षाच्या राज्यसभेतील १० सदस्यांपैकी ६ किंवा ७ सदस्यांनी देखील त्या प्रस्तावावर स्वाक्षरी केलेली नाही. मग त्यामध्ये माझी काय चूक? तरीही मलाच का दोषी ठरवलं जातयं?", असं राघव चड्ढा यांनी म्हटलं आहे.

"तसेच आम आदमी पक्षाने तिसरा आरोप माझ्यावर केला की मी घाबरलो आहे. वैयक्तिक स्वार्थाला प्राधान्य देतो असाही आरोप माझ्यावर झाला. मात्र, मी नेहमीच लोकांच्या आणि पक्षाच्या हितासाठी काम केलेलं आहे. मी संसदेत जनतेच्या प्रश्नावर आवाज उठवण्यासाठी गेलेलो आहे. मी कोणता मुद्दा संसदेत मांडला नाही? जीएसटी, इनकम टॅक्स, पंजाबच्या पाण्याचा मुद्दा, दिल्लीतील हवेचा मुद्दा, सरकारी शाळा असे अनेक मुद्दे मी संसदेत मांडले आहेत", असं राघव चड्ढा यांनी म्हटलं आहे.



## जागतिक रंगमंचावर
# रश्मिका मंदाना

दक्षिण आणि बॉलिवूड चित्रपटसृष्टीत आपली वेगळी ओळख निर्माण करणारी लोकप्रिय अभिनेत्री रश्मिका मंदाना पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. यंदा ती जपानमधील टोकियो शहरात होणाऱ्या प्रतिष्ठित ग्लोबल एनीमे अवॉर्ड्समध्ये प्रेझेंटर म्हणून सहभागी होणार आहे. हा भव्य सोहळा २३ मे रोजी पार पडणार आहे. रश्मिकासाठी ही गोष्ट खास आहे कारण याआधीही २०२४ मध्ये ती या अवॉर्ड शोमध्ये सहभागी झाली होती. त्या वेळी ती अशी संधी मिळवणारी पहिली भारतीय प्रेझेंटर ठरली होती. आता पुन्हा एकदा तिला ही संधी मिळाल्यामुळे तिच्या चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. रश्मिकाने ही आनंदाची बातमी स्वतः सोशल मीडियावर शेअर केली आहे. तिने आपल्या पोस्टमध्ये सांगितले की, जपानमध्ये जाऊन एनीमे क्षेत्रातील कलाकार, निर्माते आणि चाहत्यांसोबत हा खास क्षण साजरा करण्यासाठी ती खूप उत्सुक आहे. एनीमे आणि जपानी संस्कृतीबद्दल तिच्या मनात नेहमीच आकर्षण राहिले आहे. २०२४ मध्ये ती पहिल्यांदा जपानला गेली होती आणि त्या अनुभवाला तिने आपल्या आयुष्यातील एक खास क्षण म्हटले होते. ग्लोबल एनीमे अवॉर्ड्स हा जगभरातील एनीमे कलाकार, दिग्दर्शक, निर्माते आणि चाहत्यांना एकत्र आणणारा मोठा मंच आहे. या सोहळ्यात उत्कृष्ट एनीमे आणि संबंधित क्षेत्रातील कामगिरीचा गौरव केला जातो. त्यामुळे या मंचावर भारताचे प्रतिनिधित्व करणे ही मोठी अभिमानाची बाब मानली जाते.



## 'धुरंधर २'ची क्रेझ!

अलीकडे थिएटरमध्ये सिनेमा सुरू असताना त्यामध्ये काम करणारे कलाकार प्रेक्षकांना अचानक भेट देत सुखद धक्का देतात. मात्र अभिनेता आर. माधवनने थिएटरमध्ये जाऊन स्वतःचाच चित्रपट पाहिला. आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर २'मध्ये आर. माधवनने अजय संन्याल ही भूमिका साकारली आहे. या सिनेमातील त्याच्या भूमिकेची आणि त्याच्या लूकची मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. आर. माधवनबरोबरच या सिनेमामध्ये रणवीर सिंह, सारा अर्जुन, अर्जुन रामपाल, राकेश बेदी, संजय दत्त हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकांत दिसले. यादरम्यान आता आर. माधवनचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये पाहायला मिळते की, स्क्रीनवर धुरंधर २ या सिनेमातील सीन पाहायला मिळत आहे. अक्षय राठीने हा व्हिडीओ शेअर केला आहे. त्याच्या व्हिडीओवर नेटकरी कमेंट् करत आर. माधवनचे कौतुक केले आहे. ही पोस्ट करुन तो चाहता कॅप्शनमध्ये लिहितो की, "ISI तुम्ही काहीही प्लॅन बनवा. आम्ही तुम्हाला इतकंच सांगू इच्छितो की, अजय सन्याल यांची नजर प्रत्येक क्षण तुमच्यावर आहे. आर. माधवनसोबत पुन्हा एकदा 'धुरंधर २' बघायला मजा आली.", असं लिहित त्या चाहत्याने माधवनचा फोटोही पोस्ट केला आहे.



## 'क्वीन 2' मधून कंगना रनौतची ग्रँड एंट्री

बॉलिवूड अभिनेत्री आणि खासदार कंगना रनौत पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर झळकण्यासाठी सज्ज झाली आहे. तिच्या गाजलेल्या 'क्वीन' या चित्रपटाच्या सिक्वेलबद्दल सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. 'क्वीन 2' या चित्रपटातून कंगना पुनरागमन करणार असल्याने तिचे चाहते खूपच उत्सुक झाले आहेत. माहितीनुसार, 'क्वीन 2'ची शूटिंग एप्रिलच्या शेवटी सुरू होण्याची शक्यता आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन पुन्हा एकदा विकास बहल करणार आहेत.



पहिल्या भागाने प्रेक्षकांच्या मनात खास स्थान निर्माण केले होते. एका साध्या, भोळ्या मुलीच्या आयुष्यातील बदल आणि तिचा आत्मशोध याची कथा लोकांना खूप भावली होती. 'क्वीन 2'मध्ये मात्र कंगनाचा अंदाज पूर्णपणे वेगळा असणार आहे. या वेळी ती एका मॉडर्न, शहरी मुलीच्या भूमिकेत दिसणार आहे. आत्मविश्वासपूर्ण, स्वतंत्र आणि स्मार्ट असा तिचा स्वभाव असेल. जरी पात्र बदलले असले, तरी कथेमध्ये आत्मशोधाचा धागा कायम ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे प्रेक्षकांना पुन्हा एकदा भावनिक प्रवास अनुभवायला मिळणार आहे. पहिल्या 'क्वीन' चित्रपटात परदेशातील लोकेशन्स दाखवण्यात आले होते. मात्र 'क्वीन 2'ची कथा भारतातच घडणार आहे. मुंबईसह देशातील विविध शहरांमध्ये या चित्रपटाचे शूटिंग होणार आहे. सध्या मुंबईमध्ये पहिल्या टप्प्याचे शूटिंग करण्याची तयारी सुरू आहे. त्यानंतर इतर मेट्रो शहरांमध्येही चित्रपटाचे चित्रीकरण होणार आहे. कलाकारांच्या बाबतीतही या वेळी बदल पाहायला मिळणार आहे. पहिल्या भागात राजकुमार राव महत्त्वाच्या भूमिकेत होते, पण 'क्वीन 2'मध्ये सपोर्टिंग कास्ट पूर्णपणे नवीन असण्याची शक्यता आहे.

# समीर रिझवी एकटाच मुंबई इंडियन्सला भारी पडला!

## अक्षर पटेलचा संघ गुणतालिकेत पहिल्या स्थानी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**मुंबई इंडियन्सचा संघ प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ६ बाद १६२ धावा करण्यात यशस्वी ठरला. तर दिल्ली कॅपिटल्सच्या संघाने समीर रिझवीच्या खेळीच्या बळावर १८.१ षटकांत ४ बाद १६४ धावा करत सामना आपल्या नावे केला आहे.**




दिल्लीच्या स्लो खेळपट्टीवर धावा करणं सोपं नव्हतं, त्यात गोलंदाजांनी अचूक गोलंदाजी करत मुंबईच्या फलंदाजांना धावा करण्याची फारशी संधी दिली नाही. दिल्ली कॅपिटल्सचा यंदाच्या मोसमातील हा सलग दुसरा विजय आहे. या विजयासह दिल्लीचा संघ आयपीएल २०२६च्या गुणतालिकेत पहिल्या स्थानी पोहोचला आहे.

मुंबईने दिलेल्या १६३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरूवात खूप खराब झाली. केएल राहुल १ धाव तर नितीश राणा शून्यावर बाद झाले. पण समीर रिझवी व पथुम निसांका यांनी संघाचा डाव सावरला. निसांका ३० चेंडूत ६ चौकार व एका षटकारासह ४४ धावा करत बाद झाला. यानंतर समीर रिझवीने एकट्याने संघाला विजयापर्यंत नेलं. तर डेव्हिड मिलर एका टोकाकडून मैदानावर कायम राहत त्याला चांगली साथ दिली. रिझवी ९० धावा करत बाद झाला. मुंबईकडून मिचेल सँटनर, दीपक चहर व कार्बिन बॉश यांनी १-१ विकेट्स घेतल्या. तर बुमराहने आपल्या रॉकेट थ्रोवर नितीश राणाला धावबाद केलं होतं.




# विराट परदेशी खेळाडू आहे का? कोहलीने दिलं सडेतोड उत्तर

**महाईन्यूज । मुंबई**

**IPL 2026 मध्ये विराट कोहली दमदार फॉर्ममध्ये दिसत आहे. पहिल्याच सामन्यात त्याने नाबाद 69 धावांची खेळी करत आपल्या क्लासची झलक दाखवली. मात्र मैदानाबाहेरही त्याचा एक मजेशीर व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.**







ROYAL CHALLENGERS BANGALORE च्या इनसाइडर शोमध्ये कोहलीला एक हटके प्रश्न विचारण्यात आला. सोशल मीडियावर फिरणाऱ्या मीम्सचा संदर्भ देत विचारलं गेलं की, “लोक म्हणत आहेत RCB मध्ये 5 परदेशी खेळाडू खेळत आहेत.” हा प्रश्न ऐकताच कोहलीने लगेच हसत प्रतिक्रिया दिली आणि उलट विचारलं, “मी तो पाचवा खेळाडू आहे का?”

या प्रश्नावर कोहली हसत म्हणाला, “तुम्ही मला का विचारताय? परदेशी खेळाडूंनाच विचारा. मी काही परदेशी खेळाडू नाही, तुम्हाला वाटतय का मी परदेशी खेळाडू आहे?” त्याचा हा कूल आणि विनोदी अंदाज चाहत्यांना खूप आवडला असून हा व्हिडिओ मोठ्या प्रमाणात शेअर केला जात आहे.

गेल्या काही काळापासून कोहली आपल्या कुटुंबासोबत लंडनमध्ये राहत असल्याच्या चर्चेमुळे सोशल मीडियावर अनेक मीम्स व्हायरल होत आहेत. लोक मजेशीरपणे म्हणतात की, “कोहली आता भारतात फक्त IPL खेळण्यासाठी येतो.” या पार्श्वभूमीवरच हा प्रश्न विचारण्यात आला होता.

इंटरव्ह्यूदरम्यान त्याला नवीन हेअरस्टाइल आणि टॅटूबद्दलही विचारण्यात आलं. यावर कोहली म्हणाला, “तुम्हाला खरंच वाटतं का की मी IPL मध्ये माझा लुक दाखवायला येतो?” त्याच्या या उत्तरानेही चाहत्यांना हसू आलं.

कोहलीने यावेळी ‘विजय’ म्हणजे काय यावरही आपलं मत मांडलं. तो म्हणाला की, “जेव्हा तुम्ही एखाद्या गोष्टीसाठी मेहनत आणि समर्पण करता आणि त्यात यश मिळवता, तोच खरा विजय असतो.” विराट कोहलीचा हा व्हिडिओ त्याच्या मैदानाबाहेरील व्यक्तिमत्त्वाची झलक दाखवतो.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। रविवार ।
दि. 05 एप्रिल 2026।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




# आंबेडकर जयंतीसाठी महापालिकेची भेट; कर्मचाऱ्यांना १५ हजारांचे अग्रिम मंजूर

## पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून हप्त्याने परतफेडीच्या अटीवर आर्थिक मदत

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सणासाठी आर्थिक स्वरुपात आगाऊ रक्कम म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने अधिकारी कर्मचाऱ्यांना दरमहा हप्त्याने परतफेडीच्या अटीवर एकरक्कमी १५ हजार रुपये सण अग्रिम दिला जाणार आहे. याबाबतचा आदेश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आला आहे.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती या सणाच्या निमित्ताने अधिकारी व कर्मचाऱ्यांना आर्थिक स्वरूपात आगाऊ रक्कम देण्याचा धोरणात्मक निर्णय स्थायी समिती आणि महापालिका सभेने यापूर्वीच मंजूर केला आहे. त्यानुसार प्रत्येकी १५ हजार रुपये अग्रिम अधिकारी व कर्मचाऱ्यांना वाटप केला जाणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती हा सणासाठी महापालिका आस्थापनेवरील अधिकारी कर्मचाऱ्यांना एकरक्कमी आगाऊ रक्कम दिली जात असल्याचा हा निर्णय महत्त्वाचा समजला जातो.

सहाव्या वेतन आयोगानुसार ग्रेड वेतन ४८०० रुपयांपेक्षा कमी किंवा सातव्या वेतन आयोगानुसार पे लेव्हल एस-१७ (वेतन संरचना ४७,६०० – १,५१,१००) पेक्षा कमी असणाऱ्या पात्र सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना ऐच्छिक स्वरुपात या सण अग्रिमचा लाभ मिळणार आहे. सण अग्रिम म्हणून दिली जाणारी १५ हजार रुपयांची रक्कम सदर लाभ घेतलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या वेतनातून मे २०२६ पासून दरमहा १५०० रुपयांप्रमाणे १० हप्त्यांमध्ये परतफेड केली जाणार आहे. ही सण अग्रिमाची रक्कम १४ एप्रिल २०२६ पूर्वी अदा करावी, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

> भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, सामाजिक न्याय आणि प्रगतीचा दिलेला संदेश आजही आपल्या कामकाजाला दिशा देणारा आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना सण अग्रिम देण्याचा निर्णय हा केवळ आर्थिक मदत नसून त्यांच्या योगदानाचा सन्मान करण्याचाही एक प्रयत्न आहे.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

> भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार संपूर्ण जगाला प्रेरणा देणारे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती महापालिका उत्साहात साजरी करीत असते. शिवाय जयंतीचे औचित्य साधून भव्य स्वरुपात पाच दिवसीय विचार प्रबोधन पर्वाचे देखील आयोजन महापालिका दरवर्षी करीत असते. महापालिका आस्थापनेवरील अधिकारी कर्मचाऱ्यांकरिता या जयंती सणासाठी एकरक्कमी सण अग्रिम देऊन या जयंती उत्सव सणाचा आनंद द्विगुणित करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे.
>
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# वाढदिवस साजरा न करण्याचा आमदार शंकर जगताप यांचा निर्णय!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर चंद्रभागा पांडुरंग जगताप यांनी यंदाचा आपला वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. दिनांक ५ एप्रिल रोजी असलेल्या वाढदिवसानिमित्त कोणतेही कार्यक्रम, बॅनर्स, होर्डिंग्ज किंवा सार्वजनिक आयोजन करू नये, असे आवाहन त्यांनी स्नेही, कार्यकर्ते व हितचिंतकांना केले आहे.**




महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दुःखद निधनाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याचे जगताप यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले. अजितदादांसारखे विकासाभिमुख व संवेदनशील नेतृत्व हरपणे ही राज्यासाठी मोठी हानी असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. तसेच, वाढदिवशी शुभेच्छा स्वीकारण्यासाठी ते जनसंपर्क कार्यालयात उपस्थित राहणार नसल्याचेही त्यांनी कळविले आहे. त्यांच्या या निर्णयामुळे कार्यकर्त्यांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले असून, अनेकांनी त्यांच्या भूमिकेचे स्वागत केले आहे.

> महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे निधन ही राज्यासाठी अत्यंत वेदनादायी आणि मोठी हानी आहे. अशा दुःखद प्रसंगी आनंदोत्सव साजरा करणे मला योग्य वाटत नाही. त्यामुळे यंदाचा माझा वाढदिवस साधेपणानेही न साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, सर्वांनी कोणतेही कार्यक्रम, बॅनर्स किंवा होर्डिंग्ज न लावता या निर्णयाला सहकार्य करावे, ही नम्र विनंती."
>
> **- शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.**



# ‘इन्फिनिक्स कॅम्पस कनेक्ट’ स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## १३८ विद्यार्थ्यांचा सहभाग; ई-स्पोर्ट्समधील करिअर संधींबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**



**डिजिटल युगातील ई-स्पोर्ट्सला प्रोत्साहन देण्यासाठी गेमफोर्ज ई-स्पोर्ट्स क्लबच्या वतीने आयोजित ‘इन्फिनिक्स कॅम्पस कनेक्ट’ हा उपक्रम नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. शहरातील १२ नामांकित महाविद्यालयांतील तब्बल १३८ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेत आपल्या गेमिंग कौशल्याचे प्रदर्शन केले.**

स्पर्धेचे मुख्य आकर्षण ‘कॉल ऑफ ड्युटी (मोबाईल)’ ही गेमिंग स्पर्धा ठरली. सुमारे १५ हजार रुपयांचे बक्षीस आणि आकर्षक भेटवस्तू जिंकण्यासाठी सहभागी खेळाडूंमध्ये चुरशीची लढत रंगली.

कार्यक्रमाला ‘फ्री फायर’चे प्रसिद्ध कास्टर वेद भाकडे तसेच लोकप्रिय कंटेंट क्रिएटर जय भांगर यांनी विशेष उपस्थिती दर्शवली. त्यांनी विद्यार्थ्यांना ई-स्पोर्ट्स क्षेत्रातील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन करत प्रेरणादायी विचार मांडले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे डायरेक्टर डॉ. बी. बी. वाफारे, डीन-स्टुडंट अफेयर्स डॉ. सुनील महाजन आणि प्रा. जयवंत भूमकर यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थी प्रतिनिधी मधुर घाटे (अध्यक्ष) आणि शिवम सामंत (उपाध्यक्ष) यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकांनी कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन केले. गेमिंगसोबतच नेटवर्किंग आणि नव्या गोष्टी शिकण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरल्याची भावना सहभागी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

### ई-स्पोर्ट्सकडे तरुणाईचा वाढता कल

‘इन्फिनिक्स कॅम्पस कनेक्ट’ स्पर्धेला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादातून ई-स्पोर्ट्स क्षेत्रातील वाढती क्रेझ स्पष्ट झाली. १२ महाविद्यालयांतील १३८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत ‘कॉल ऑफ ड्युटी (मोबाईल)’ या स्पर्धेत आपल्या कौशल्याचे प्रदर्शन केले. स्पर्धेत आकर्षक बक्षिसांसाठी चुरशीची लढत रंगली. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून ई-स्पोर्ट्समध्ये करिअरच्या नव्या संधी उलगडल्या, तर गेमिंगसोबत नेटवर्किंग आणि नव्या कौशल्यांचा विकास साधण्यासही या उपक्रमाची मोठी मदत झाली.



# दापोडी ते कासारवाडी १९ तास अंधारात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील दापोडी, फुगेवाडी, सांगवी (जुनी-नवीन), पिंपळे गुरव आणि कासारवाडी या भागांत तब्बल १९ तास वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांचे प्रचंड हाल झाले. गुरुवारी दुपारी दोनपासून शुक्रवारी सकाळी सव्वा नऊपर्यंत वीज नसल्याने हजारो कुटुंबांना अंधारात रात्र काढावी लागली. यामुळे काही भागांत पाणीपुरवठाही विस्कळीत झाला होता.**

अचानक आलेल्या वादळी वाऱ्यांमुळे आणि पावसामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचे प्राथमिक कारण सांगितले जात असले तरी ही घटना पूर्णतः नैसर्गिक होती की ‘महावितरण’च्या अपुऱ्या नियोजनाचा परिणाम, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी महावितरणने ठोस उपाययोजना करण्याची मागणी ज्ञानमाता माहिती अधिकार नागरिक समूहाने केली आहे.

वादळी पावसाच्या पार्श्वभूमीवर महावितरणकडून अपेक्षित तयारी दिसून न आल्याने संताप व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे आपत्कालीन व्यवस्थापनाची पोलखोल झाल्याची टीका नागरिकांतून होत आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत निर्णयांचा खोळंबा; आयुक्तांच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेत नवीन आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी रुजू होऊन जवळपास महिना उलटला असला, तरी शहराच्या दृष्टीने कोणताही ठोस निर्णय न झाल्याने प्रशासनाच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महापौरांनी पत्रकार परिषदेत १ एप्रिलपासून आयुक्त प्रत्यक्ष कामकाजाला गती देतील, असे जाहीर केले होते. मात्र, ती तारीख उलटूनही महत्त्वाच्या विषयांवर कोणतीही निर्णायक हालचाल न झाल्याने राजकीय वर्तुळात नाराजी व्यक्त होत आहे.**





शहराला वेगवान आणि परिणामकारक प्रशासनाची गरज असताना आयुक्त अजूनही ‘अभ्यास’ करण्यात व्यस्त असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये उपरोधिक प्रतिक्रिया उमटत असून, प्रशासनाच्या भूमिकेबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

दरम्यान, “पिंपरी-चिंचवडला कोण ओळखते?” या कथित वक्तव्यामुळे वाद अधिकच तीव्र झाला आहे. शहराच्या अस्मितेला धक्का पोहोचवणाऱ्या या विधानाचा आमदारांसह सर्वपक्षीय नेत्यांनी निषेध केला होता. मात्र, या प्रकरणी आयुक्तांकडून अद्याप कोणतीही दिलगिरी व्यक्त करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रशासनाची संवेदनशीलता आणि लोकप्रतिनिधींबाबतचा दृष्टिकोन यावर प्रश्न उपस्थित होत आहेत.

यापूर्वी अतिरिक्त पदभाराच्या काळातही निर्णयप्रक्रियेला अपेक्षित वेग मिळाला नव्हता, अशी टीका झाली होती. आता पूर्णवेळ आयुक्तांकडूनही तशीच कार्यपद्धती दिसत असल्याची चर्चा आहे.

महापालिकेतील पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, महसूल, अनधिकृत बांधकामांवरील कारवाई, करसंकलन यांसारखे महत्त्वाचे विषय प्रलंबित आहेत. त्यामुळे शहराच्या विकासकामांना गती मिळणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### निर्णयप्रक्रियेचा ठप्प कारभार

पिंपरी-चिंचवड महापालिकेत महत्त्वाच्या विकासकामांचे प्रस्ताव प्रलंबित असून प्रशासनाकडून अपेक्षित वेगाने निर्णय घेतले जात नसल्याची टीका होत आहे. पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, करसंकलन आणि अनधिकृत बांधकामांवरील कारवाई यांसारखे प्रमुख विषय रखडले आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत असून प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

# महापालिकेचा २५ टक्के नालेसफाईचा दावा; मग पाणी तुंबलेच कसे?



> मार्च महिन्यांत नालसफाईला सुरुवात करण्यात आली आहे. २५ टक्के नाल्यांची सफाई करण्यात आली. मोठ्या नाल्यांसाठी स्पाईडर जेट मशीन उपलब्ध नव्हते. त्यामुळे ते नाले साफ करण्यात आले नव्हते. त्या मशीन उपलब्ध झाल्या की मोठे नाले साफ करण्यात येतील. पाणी तुंबलेल्या ठिकाणी तातडीने उपाययोजना केल्या आहेत.
>
> - प्रदीप ठेंगल, उपायुक्त, महापालिका

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महापालिकेकडून शहरातील २५ टक्के नालेसफाई पूर्ण झाल्याचा दावा केला जात असताना अवकाळी पावसात भागांत पाणी तुंबल्याने प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नालेसफाईचे दावे कागदावरच राहिले असून स्थापत्य विभागाच्या अर्धवट आणि विस्कळीत कामांमुळे पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी रस्त्यांवरच साचत असल्याचे वास्तव समोर आले आहे.**

### स्थापत्य विभागांकडून नीट कामांचा अभाव

स्थापत्य विभागाकडून रस्ते बनवताना पाण्याच्या प्रवाहाचा अभ्यास न करता कामे उरकली जात आहेत. काही ठिकाणी नव्याने केलेले रस्ते आजूबाजूच्या पातळीपेक्षा उंच झाले असून बाजूच्या गटारी कमी उंचीवर राहिल्याने पाणी उलट रस्त्यावरच साचत आहे. त्यामुळे वाहनचालक, पादचारी आणि व्यापाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

शहरातील विविध रस्त्यांवर सुरू असलेली खोदकामे, पेव्हिंग ब्लॉक व काँक्रिटीकरणाची कामे अनेक ठिकाणी अर्धवट अवस्थेत आहेत. विशेष म्हणजे या कामांमध्ये पाण्याच्या नैसर्गिक उताराचा विचारच न केल्याने पाणी वाहून जाण्याचा मार्ग बंद झाला आहे. परिणामी अवकाळी पावसातच मुख्य रस्ते, चौक आणि सेवा रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचले.

नालेसफाई झाली असल्याचा दावा करणाऱ्या प्रशासनाने मग हे पाणी नेमके कुठे अडले, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. नाल्यांमध्ये गाळ काढला असला तरी रस्ते कामांमधील नियोजनशून्यता आणि ड्रेनेज लाईनशी योग्य जोडणी न केल्याने पावसाच्या पाण्याचा निचरा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे.

# भामा आसखेड प्रकल्पात ट्विस्ट; बडतर्फ ठेकेदार पुन्हा मैदानात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**



**पाच वर्षांपासून रखडलेल्या आणि तीन वेळा मुदतवाढ देऊनही ७० टक्केच पूर्ण झालेल्या भामा आसखेड जलवाहिनीचे उर्वरित कामही संबंधित ठेकेदाराकडून करून घेण्याच्या हालचाली सुरू आहेत. तत्कालीन आयुक्तांनी या ठेकेदाराला बडतर्फ करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, नवीन निविदा प्रक्रिया केल्यास एक वर्षपेक्षा अधिक कालावधी लागू शकेल, म्हणून जुन्याच ठेकेदाराला काम देण्याचा निर्णय होण्याची शक्यता आहे.**

पिंपरी-चिंचवड शहराला सध्या मावळातील पवना आणि आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. शहरासाठी १६७ दशलक्ष लिटर पाणी आरक्षित असलेल्या भामा आसखेड जलवाहिनीचे काम रखडले आहे. सद्य:स्थितीत ७० टक्के काम पूर्ण झाले असून, ३० टक्के काम बाकी आहे.

मुदतवाढ देऊनही काम पूर्ण न झाल्याने तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी संबंधित ठेकेदाराला बडतर्फ केले. नवीन ठेकेदार नियुक्तीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्याची तयारी प्रशासनाने केली. आता नवनियुक्त आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी लोकप्रतिनिधींबरोबर प्रत्यक्ष कामाची पाहणी केली असून, संबंधित ठेकेदाराच्या अडचणी समजून घेतल्या.


नवीन ठेकेदार नियुक्त केल्यास कामाला आणखी विलंब होईल. त्यामुळे जुन्या ठेकेदाराकडून काम करून घ्यायचे, की नवीन ठेकेदार नियुक्त करायचा, असा पेच प्रशासनासमोर होता. नवीन प्रक्रियेमुळे किमान वर्षभरापेक्षा अधिक वेळ लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे कामातील अडचणी सोडवण्यासह अटी व शर्तींच्या अधीन राहून काम करण्यास तयार असल्यास पूर्वीच्याच ठेकेदाराकडून जलवाहिनीचे काम पूर्ण करण्यावर भर दिला जाणार असल्याचे पाणीपुरवठा विभागाने सांगितले.

जलवाहिनीच्या ३० टक्के कामासाठी नवीन निविदा प्रक्रिया केल्यास एक वर्षपेक्षा अधिक कालावधी लागू शकतो. त्यामुळे जुन्याच ठेकेदाराकडून अटी व शर्तींच्या अधीन राहून काम करण्याचे विचाराधीन आहे, असे पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

# गॅस टंचाईवर सरकारचा मोठा निर्णय; पाईप्ड गॅस जोडणीला वेग

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**राज्यातील गॅसटंचाईच्या पार्श्वभूमीवर कॅबिनेटमध्ये नुकतीच चर्चा झाली. त्यानंतर अवघ्या बारा तासातच गॅस कंपनीच्या वितरकांची मुख्य सचिवांनी बैठक घेतली. यात पुढील दोन महिन्यांत नॅचरल गॅस कंपनीकडून पाइप्ड गॅस जोडणी पूर्ण केली जाणार आहे. त्यानुसार, कंपन्या, हॉटेल व्यावसायिकांना गॅसची तातडीने जोडणी देण्याच्या निर्देश दिले आहेत. याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यास कडक कारवाई केली जाईल, असा इशारा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी संबंधितांना दिला.**



पुणे, मावळ शिवसेनेचे संपर्कप्रमुख झाल्यानंतर मंत्री सामंत यांनी शुक्रवार (दि. 3) आढावा बैठक घेतली. पिंपरी, चिंचवड, भोसरी, मावळ विधानसभा मतदारसंघातील सर्व शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, युवती सेनेच्या कामाचा आढावा घेतला. थेरगाव येथे एका हॉलमध्ये शुक्रवार (दि. 3) बैठक पार पडली. शिवसेना उपनेते खासदार श्रीरंग बारणे यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले की, दोन महिन्यांत एमएनजीएल कंपनीकडून जेथे पाईप्ड कनेक्शन देणे शक्य आहे. तेथे लवकर देण्याच्या सूचना केल्या आहेत. वेगवेगळ्या कंपन्या, हॉटेल व्यावसायिक एमएनजीएलकडे पाठपुरावा करीत आहेत; मात्र यामध्ये काहीजण जोडणीबाबत जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत असल्यास त्याची निश्चित दखल घेतली जाईल. त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यईल.

उद्योजकांना आणि त्यानंतर घरगुती गॅस वितरणाला कोणतीही अडचण येऊ नये, अशी आमची भूमिका आहे. दरम्यान, राज्य शासनाच्या निर्णयामुळे पुण्यात शेकडो पाइप्ड गॅसचे कनेक्शन घेतले आहे. तरी, उद्योजकांना ताकद देण्यासाठी आणखी प्रयत्न केले जाणार आहेत.

### इंद्रायणी, पवनेचा डीपीआर तयार

इंद्रायणी, पवनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल अर्थात डीपीआर पूर्ण झाला आहे. तो पाच एजन्सीमार्फत करण्यात येणार आहे. त्यात एमआयडीसी, पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका, पीएमआरडीए आणि पर्यावरण विभाग तसेच, अमृत योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडूनदेखील निधी मिळण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. ते अंतिम टप्प्यात असल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले.